महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४३

# महाराजा सयाजीराव आणि दादासाहेब फाळके

धारा भांड मालुंजकर



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४३

# महाराजा सयाजीराव
# आणि
# दादासाहेब फाळके

धारा भांड मालुंजकर

महाराजा सयाजीराव
आणि दादासाहेब फाळके
इतिहास
धारा भांड मालुंजकर
●
प्रकाशन क्रमांक - ६३
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : धारा भांड मालुंजकर
१, निवास ब्लॉसम,
शरणपूर त्र्यंबक लिंक रोड,
कॅनडा कॉर्नर, नाशिक -४२२ ००५
मो. ९८८१७४५६०८
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३४ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# दादासाहेब फाळके

महाराजा सयाजीराव गायकवाडांना शिक्षण हेच प्रगती आणि परिवर्तनाचे एकमेव साधन आहे हे कळाले होते. प्रजा जर अशिक्षित राहिली तर ती रोजच्या कामात, राजकारणात, कारभारात, प्रशासनात सहयोग देऊ शकणार नाही. महाराज जगभरात जिथे जिथे फिरले आणि तिथे जे जे म्हणून नवीन पाहिले, ते आपल्या राज्यात कसे आणता येईल याशिवाय त्यांच्या डोक्यात दुसरा कोणताच विचार नसे. ते नेहमी म्हणत "I have no domestic life" प्रजेचा पालनकर्ता या भूमिकेत ते कायम असत. प्रथम प्रजा, मग राजा असे धोरण त्यांनी अवलंबविले होते. प्रजेला नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती आणि त्याचबरोबर प्रशिक्षण या दोन गोष्टींना त्यांनी नेहमी प्राधान्य दिले. याचसाठी १८९० मध्ये महाराजांनी कलाभवनाची स्थापना केली. या संस्थेचे नाव सुध्दा खूप मार्मिक ठेवले गेले. तंत्रशिक्षणाने युरोपात केलेली प्रगती ते स्वत: डोळ्याने बघून आणि अनुभव घेऊन आले होते. नवे तंत्रज्ञान शिकल्याशिवाय आणि त्याचा वापर केल्याशिवाय भारत प्रगती करू शकणार नाही, हे त्यांनी १४० वर्षांपूर्वीच ओळखले होते.

आजच्या काळाचीसुध्दा हीच गरज आहे. यावरून महाराजांची दूरदृष्टी दिसून येते. इतर संस्थानिक जेव्हा ऐशोआरामात जीवन जगत होते, तेव्हा महाराजांना बडोद्या राज्याच्या प्रगतीशिवाय दुसरे काहीच विचार सुचत नव्हते.

कला आणि तंत्रज्ञान यांचे एकाच ठिकाणी शिक्षण घेऊन विद्यार्थी व्यावसायिक प्रगती करू शकेल हाच कलाभवनाचा उद्देश होता. या कलाभवनात संगीत, चित्रकला, कुंभारकाम, रंगकाम, ब्लिचिंग, कॅलिको प्रिंटिंग, मूर्तिकाम - शिल्पकाम, वास्तुकला, स्थापत्यकला, ग्राफिक्स (Graphics), अप्लाइड आर्ट्स(Appliedarts),आर्टहिस्ट्री(ArtHistory),सौंदर्यशास्त्र, वस्तुसंग्रहालयशास्त्र, छायाचित्रकला (Photography) वगैरे विषय शिकविले जात असत. आपल्या राज्यात असे निरनिराळे विषय शिकून त्यातले तज्ज्ञ लोक तयार व्हावेत आणि त्यांनी या सर्व कला आणि तंत्रज्ञानाचा प्रसार करावा. त्याचा व्यवसायात उपयोग करून राष्ट्रातली उद्योजकता वाढवावी हेच एकमेव ध्येय ठेवून महाराजांनी कलाभवनाची स्थापना केली होती.

महाराजांनी अनेक वर्षांपासून फोटोग्राफी या कलेला प्रोत्साहन दिलेले होते. ‘विविध कला मंदिर’ या नावाची फोटोग्राफीची संस्था बडोद्यात होती. ती त्यावेळेस सुप्रसिध्द होती व त्याचे सर्व श्रेय त्यातील कुशल कारागीर श्री. शितूत यांना जात होते. शितूत हे कलाभवनातून शिकून तयार झालेले विद्यार्थी होते. इ. स. १९०० च्या सुमारास महाराजांनी कलाभवनास भेट दिली.

कलाभवनात अनेक विषयात प्रावीण्य संपादन करणारे विद्यार्थी म्हणून ते महाराजांच्या निदर्शनास आले. महाराजांनी त्यांना शिक्षकाची नोकरी करण्यापासून परावृत्त करून फोटोग्राफीच्या कलेच्या उन्नतीसाठी स्वतंत्र संस्था काढण्यास उत्तेजन दिले होते. त्याप्रमाणे शितूत यांनी वरील संस्था काढली होती.

महाराजांनी कलाभवनात शिक्षण घेणाऱ्या हुशार मुलांना नेहमीच शिष्यवृत्ती दिली. शिल्पकार कोल्हटकर असो किंवा दादासाहेब फाळके असो या सर्वांची आपल्या आवडत्या विषयात शिक्षण घेण्याची मोठी सोय यामुळे होऊ शकली. यातून आपल्या व्यवसायात यशस्वी होऊन नाव, कीर्ती मिळविलेले कितीतरी नामवंत कलाकार तयार झाले. त्यांच्या या यशाचा पाया कलाभवनामुळे पक्का झाला होता. नंतर त्यांनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या कामामुळे प्रसिध्द कलाभवनचे देशभर नाव झाले. चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके हे कलाभवनातच शिकले आणि भारताचा पहिला चित्रपट “राजा हरिश्चंद्र” बनवून, चित्रपट इतिहासात आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरून ठेवले आहे.

## दादासाहेब आणि बडोदा संबंध

दादासाहेब फाळके म्हणजे धुंडीराज गोविंद फाळके यांचा जन्म ३० एप्रिल १८७० ला नाशिकमधल्या त्र्यंबकेश्वर या तीर्थक्षेत्री झाला. त्यांचे वडील गोविंद सदाशिव ऊर्फ दाजीशास्त्री व मातोश्री द्वारकाबाई होत्या. दाजीशास्त्रींनी मंदिरातील

पुरानिक पेशा पत्करल्यामुळे याज्ञिकी, वैद्यकी व्यवसायाबरोबर महाभारत, रामायण, भागवत, वेद, उपनिषद त्यांना तोंडपाठ होते. दादासाहेबांना सहा भावंडे होती. सर्वात थोरले बंधू शिवरामपंत, दादासाहेबांपेक्षा बारा वर्षांनी मोठे होते. ते बडोद्याला दिवाण श्री. आर. सी. दत्त यांच्या हाताखाली रेव्हेन्यू खात्यात नोकरी करत असत. दादासाहेबांना चार बहिणी होत्या. त्यापैकी एका बहिणीचे लग्न बडोद्याच्या पटवर्धनांशी झाले होते. त्यामुळे बहीणही बडोद्यात होती. दाजीशास्त्री मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यामुळे फाळके कुटुंब मुंबईत स्थायिक झाले. दादासाहेबांचे प्राथमिक शिक्षण त्र्यंबकेश्वरला झाले होते, तर मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मुंबईत मराठा हायस्कूल येथे झाले होते.

दादासाहेबांनीही आपला संस्कृत पंडिताचा व्यवसाय पुढे चालवावा अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. पण दादासाहेबांना चित्रकला हा विषय खूप आवडायचा. त्यांचा सगळा कल कलेकडे होता. त्यांना कलेची जन्मजात दैवी देणगी मिळालेली होती. घरगुती समारंभात ते सुबक सुंदर रांगोळ्या काढायचे. तसेच विविध उत्सवात देखावे, मखरी, सजावट तयार करून देण्याचे काम ते मन लावून करत असत. त्यांच्यातल्या कलाकाराला ही कामे करण्यात कधी कंटाळा येत नसे. पुढे ते श्रीगणेशाच्या आकर्षक मूर्तीही बनवू लागले. मुलाची आवड आणि शिकण्याचा कल लक्षात घेऊन वडिलांनी त्यांना त्यांच्या



इच्छेनुसार इ. स. १८८५ मध्ये मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमध्ये प्रवेश दिला. या संस्थेच्या स्नेहसंमेलनाच्या एका नाटकात त्यांनी रंगभूमीवर सर्वात पहिली भूमिका केली. हौशी कलाकार म्हणून त्यांनी आणखी काही नाटकात भूमिका केल्या. त्यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टचा चित्रकलेचा एक वर्षाचा कोर्स पूर्ण केला. त्यानंतर आपल्या कलेला अधिक वाव मिळावा म्हणून ते मोठे बंधू शिवरामपंत फाळके यांच्याकडे बडोद्याला आले. त्यांनी कलाभवनात पुढील कला शिक्षणासाठी प्रवेश घेतला.

## बडोद्याचे कलाभवन आणि दादासाहेब

कलाभवनातून त्यांनी तैलरंगचित्रण, जलरंगचित्रण, वास्तुकला आणि नमुना प्रतिरूपण (मॉडेलिंग) यामध्ये प्रावीण्य मिळवले. याचबरोबर इ.स. १८९० ला त्यांनी छायाचित्रण, प्रकाश शिलामुद्रण (फोटोलिथोग्राफी) या व्यावसायिक कलांचेही शिक्षण घेतले. त्यात विविध प्रयोगही केले. कलाभवनाचे प्राचार्य टी. के गज्जर हे खूप कल्पक होते. महाराजा सयाजीरावांनी गज्जरसारखे प्राचार्य कलाभवनाला दिल्यामुळे कलाभवनाचे कार्य अतिशय उत्तम चालले होते. महाराजांचे वैयक्तिक लक्ष कलाभवनाकडे विशेष होते. कलाभिरुची भावी पिढी तयार करण्याचे काम कलाभवन करत होते. त्याकरिता विविध कलांची आवड असलेले विद्यार्थीच हे काम करतील, या दृष्टीने संस्कार केले जाऊ लागले. महाराजांची सामाजिक सुधारणांची कल्पकता आणि त्याला दूरदृष्टीची जोड मिळाल्याने पुढे भारतात दादासाहेब फाळकेंसारखे रत्न निर्माण झाले. महाराज रत्नपारखीच होते म्हटले तर वावगे ठरणार नाही.

कलाभवनात ओतकाम, सुतारकाम, लोहारकाम, घड्याळ दुरूस्ती हेही कौशल्य विषय शिकवले जात होते. येथे शिकणाऱ्या हुशार मुलांना शिष्यवृत्ती मिळत असे. शिक्षणास लागणारी साधने विनामूल्य मिळत असत. सर्व शिक्षक त्यांच्या विषयात खूप कुशल होते. त्यावेळेस कलाभवन हे राजमहल समोरच्या

सेनापती कचेरीच्या इमारतीत होते. सयाजीराव महाराज स्वत: कधीही अचानक कलाभवनास भेट देत असत. त्यामुळे तेथील शिक्षकांना तांत्रिक कामात दक्ष राहावे लागत असे. दादासाहेब जेव्हा कलाभवनात आले, तेव्हा त्यांनी मूर्तिकला शिकण्यास प्रारंभ केला. ते शिवलाल उगारचंद सलाट यांच्या हाताखाली मातीकाम शिकले. त्याचप्रमाणे मशीन ड्रॉइंग, फोटोग्राफी इत्यादीचे वर्गही त्यांनी पूर्ण केले. त्यावेळेस अगदी अद्ययावत डार्करुम कलाभवनात उपलब्ध होती. तसेच अत्यंत आधुनिक किमती जर्मन व विलायतेतले कॅमेरे उपलब्ध होते. अशाप्रकारे कलाभवन आधुनिक सामग्रीने सज्ज होते. त्यामुळे दादासाहेबांनी या तंत्रज्ञानाचा पुरेपूर लाभ घेतला. प्राचार्य गज्जरांनी दादासाहेबांना सर्व उपकरणे हाताळायची परवानगी दिली होती.

## कलाभवनात चित्रपट निर्मितीचा पाया रोवला

दादासाहेबांचा चित्रपटासाठी आवश्यक तंत्रांचा अभ्यास बडोदा कलाभवनात झाला. कलाभवनात शिकत असताना चित्रपट निर्मितीबाबत कोणताही विचार त्यांच्या मनात नव्हता. आर्किटेक्चर आणि मॉडेलिंग या विषयातही ते तरबेज झाले होते. याच दरम्यान त्यांनी एक छायाचित्रणाचा कॅमेरा घेतला होता. छायाचित्र कसे घ्यायचे, त्यावरील प्रक्रिया, प्रिंटिंग वगैरे स्वत:च प्रयोग करून शिकत होते. इ.स. १८९२ ला त्यांनी एका नाट्यगृहाची सुबक आणि आदर्श प्रतिकृती तयार केली

होती. अहमदाबादच्या औद्योगिक प्रदर्शनात या आराखड्यास सुवर्णपदक बहाल करण्यात आले. दादासाहेबांना इतर कलांतही सुवर्ण व रौप्यपदके वेळोवेळी मिळत होती. त्यामुळे कलाभवनाचा एक हरहुन्नरी विद्यार्थी म्हणून ते ओळखले जाऊ लागले. प्राचार्य गज्जरांनी महाराजांच्या परवानगीने इ.स. १८९३ मध्ये दादासाहेबांना कलाभवनाचा फोटो स्टुडियो व रसायनशाळा वापरण्याची पूर्ण मुभा दिली. मग दादासाहेब या छायाचित्रणाच्या कामात दिवसेंदिवस रमू लागले. पुष्कळ वेळा ते रसायनशाळेत रात्री उशिरापर्यंत काम करत असत. याचबरोबर फाळकेज् फोटो एनग्रेव्हिंग व फोटो प्रिंटिंग ही त्यांची संस्थाही नावारूपास आली. या आपल्या संस्थेचे काम ते विदेशी छायाचित्रकाराइतकेच दर्जेदार करू लागले. तसेच ते बडोद्यात उस्ताद मौलाबक्ष यांच्या गायनशाळेत शास्त्रीय गायन शिकले.



तसेच नाटककार शंकर मोरो रानडे यांच्याकडे संवाद व कथानक लेखन याचे शिक्षण घेतले. त्याबरोबर त्यांनी वडिलोपार्जित कीर्तन कलापण जोपासली. त्यात त्यांना गाणे अन् अभिनय या कौशल्याची साथ मिळाली.

कलाभवनचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी गोध्रा येथे फोटोग्राफीचा स्टुडिओ उभारला. स्वत:चा व्यवसाय सुरू केला; परंतु त्यात अपयश आले. इ. स. १९०० मध्ये गोध्रा येथे प्लेगची भयानक साथ पसरली होती. त्यात दादासाहेबांच्या पत्नीचा मृत्यू झाला. ते परत बडोद्यात आले. ते त्यावेळेस नीळकंठेश्वर महादेवाच्या परिसरात राहत असत. तिथे त्यांनी परत छायाचित्रणाचा व्यवसाय सुरू केला. अधिक अर्थार्जन होण्यासाठी त्यांनी नाटक कंपन्यांचे पडदे रंगवून देण्याचे काम सुरू केले होते. कलाभवनात विविध कलाशिक्षणाचा त्यांना आयुष्याच्या उमेदीच्या काळात अर्थार्जन करण्यास उपयोग होत होता. महाराजांनी आपल्या प्रजेला नेहमीच नवनवीन अनुभव दिले. देशविदेशमधले कलाकार मंडळी बडोद्यात निमंत्रित केले जात होते आणि बडोद्यात कलेला प्रतिष्ठा आहे याची ख्याती देशभर पोहोचल्याने कलाकारांनाही येथे येण्याची ओढ असे. त्याच सुमारास बडोद्याला एक जर्मन जादूगार आला होता. नेहमीच नवीन कला शिकण्याची दादासाहेबांची सवय त्यांना आताही गप्प बसू देत नव्हती. त्यांनी या जर्मन जादूगाराशी परिचय करून घेतला. त्यांची त्याच्याशी चांगली मैत्री झाली.

दादासाहेबांनी या जर्मन जादूगाराकडून रासायनिक, तांत्रिक, भ्रांतीकृत, पत्याची जादू वगैरे प्रकार शिकून घेतले. त्याचा उपयोग पुढे चित्रपट व्यवसायात त्यांना ट्रिक फोटोग्राफीसाठी खूप झाला. इ.स. १९०१ सालाच्या अखेर दादासाहेब प्रो. केल्फा (फाळके या आडनावाचा उलटा क्रम) या नावाने जाहिररीत्या प्रयोग करू लागले होते आणि जादूगार म्हणून त्यांना चांगलीच लोकप्रियता मिळाली होती. त्यांनी चित्रपट निर्मिती सुरू केल्यावर आपल्या जादूच्या प्रयोगाचे चित्रीकरण करून ठेवले होते. इ.स. १९०२ साली दादासाहेबांचा द्वितीय विवाह बडोद्याला शंकर वासुदेव करंदीकर यांची कन्या व किर्लोस्कर नाटक कंपनीचे प्रमुख गायक नट भाऊराव कोल्हटकर ( भावडया ) यांची भाची सरस्वती हिच्याशी झाला.

त्यावेळेस अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया, जपान येथे चलचित्रपट निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू होते. त्यात अमेरिका सर्वात आघाडीवर होती. दादासाहेब जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिक्षण पूर्ण करत असताना इ.स. १८८५ मध्ये अमेरिकेच्या जॉर्ज ईस्टमन या कल्पक गृहस्थाने चलत चित्रपट तयार करण्यासाठी लागणारी फिल्म फीत तयार केली आणि योगायोग असा की, दादासाहेब “कलाभवन” मध्ये शेवटच्या वर्षाला असताना जॉर्ज इस्टमनने आणखी सुधारणा करून सध्या सर्वांना माहिती असलेली फिल्म तयार केली. हा चित्रपट कलेच्या प्रगतीचा

महत्त्वाचा टप्पा होता. फिल्म तयार झाल्यावर त्या फिल्मचा उपयोग करून घेता येईल, असा कॅमेरा ब्रिटिश संशोधक विल्यम फ्रिजग्रीन याने त्याचवर्षी बनविला. चलतचित्रण आणि चित्रप्रक्षेपण यात बरीच प्रगती झाली. म्हणून विल्यम फ्रिजग्रीनला चित्रपटकलेचा जनक मानतात. प्राचार्य गज्जरानी कलाभवनाचा फोटो स्टुडिओ व रसायन शाळा फाळकेंच्या ताब्यात दिली आणि नवनवीन प्रयोग करण्यास फाळकेंना शक्य झाले. वेळेचे बंधन नसल्याने फाळकेंनी कलाभवनाच्या स्टुडिओत बरेच दिवस निरनिराळे प्रयोग केले. हा त्यांचा पहिला चित्रपट काढण्याच्या महान कार्याचा महत्त्वाचा टप्पा मानला गेला.

## 'राजा हरिश्चंद्र' भारतीय पहिला चित्रपट

दादासाहेबांनी इ.स. १९०३ मध्ये भारतीय पुरातत्त्व खात्यात प्रारूपकार आणि छायाचित्रकार म्हणून नोकरी पत्करली. या फिरतीच्या नोकरीमुळे त्यांना भारतातील अनेक वास्तुशिल्पे पाहता आली; पण स्वातंत्र्यलढ्यात लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या वंगभंग चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव पडला आणि चळवळीला साथ देत त्यांनी ही सरकारी नोकरी तीन वर्षात सोडून दिली. इ.स. १९०८ मध्ये त्यांनी लोणावळ्याला 'फाळके एनग्रेव्हिंग अँड प्रिंटिंग प्रेस (वर्क्स)' ही संस्था सुरू केली. पुढे ती दादरला हलविली. तिचे रूपांतर 'लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग वर्क्स' मध्ये झाले. इ.स. १९०९ मध्ये दादासाहेब जर्मनीहून तीनरंगी

मुद्रणप्रक्रियेचे अद्ययावत तांत्रिक शिक्षण घेऊन भारतात परतले व ही संस्था त्यांनी भरभराटीस आणली. पण व्यवसायातील भागीदारांबरोबर बेबनाव झाल्यामुळे ते इ.स. १९११ ला वेगळे झाले.यामुळेदादासाहेबउद्विग्नहोते.याचदरम्यानत्यांनीमुंबईमध्ये लाईफ ऑफ जिझस ख्राईस्ट (म. शी. 'ख्रिस्ताचे जीवन') हा मूक चित्रपट पाहिला आणि त्यांच्या आयुष्यातले ध्यासपर्व सुरू झाले. स्वदेशी चित्रपट बनवायचा या विचाराने त्यांना झपाटून टाकले. भारतीय इतिहासातील महान व्यक्तिमत्त्व असलेल्या श्रीकृष्णाच्या जीवनावरही असाच चित्रपट बनवायचा ध्यास घेऊन अथक प्रयत्नांनी त्यांनी लंडनला जाऊन चित्रपटविषयक तांत्रिक ज्ञान मिळवले. तेथे आवश्यक यंत्रसामग्री आणि कच्चा




माल मागविण्यासाठी नोंदणीही केली व ते भारतात परतले (१ एप्रिल १९१२). तेथील वास्तव्यात प्रसिद्ध चित्रपट निर्माते सेसिल हेपवर्थ यांच्याशी त्यांचा परिचय झाला. सर्व सामग्री मे महिन्यामध्ये हाताशी आल्यावर प्रयोगादाखल जून-जुलैमध्ये रोपट्याची वाढ हा एका मिनिटाचा लघुपट तयार केला. काही निवडक व्यक्तींना दाखवला. त्याचा योग्य परिणाम वाटल्याने पत्नीचे दागदागिने गहाण ठेवून भांडवल उभे करून लवकरच मुंबई (दादर) येथे फाळके चित्रपटनिर्मितिगृहाची स्थापना केली. सहा महिन्यात मुंबईच्या कोरोनेशन चित्रपटगृहामध्ये त्यांनी निर्मिलेला 'राजा हरिश्चंद्र' हा संपूर्ण भारतीय बनावटीचा पहिला मूकपट इ.स. १९१३ ला तयार केला आणि भारतात चलचित्रांचा आरंभ झाला. फाळकेंच्या 'राजा हरिश्चंद्र' चं बजेट त्या काळी १५ हजार रुपये होते असं म्हटले जाते.

राजा हरिश्चंद्रच्या यशाने खऱ्या अर्थाने भारतीय चित्रपटसृष्टीचा एक व्यवसाय म्हणून पाया रचला गेला. या चित्रपटाकरिता लेखक, छायालेखक, रंगवेशभूषाकार, कलादिग्दर्शक, संकलनकार, रसायनकार इ. सर्व भूमिका दादासाहेबांनी स्वत:च पार पाडल्या. या चित्रपटांनंतर त्यांनी मोहिनी भस्मासुर (१९१३), सत्यवान सावित्री (१९१४) या चित्रपटांची निर्मिती केली. यांनाही चांगले व्यावसायिक यश लाभले.

## इंग्लंड दौरा

दादासाहेबांनी इ.स. १९१४ मध्ये पुन्हा इंग्लंडला प्रयाण केले. या वास्तव्यात त्यांनी निर्मिती केलेले चित्रपटही तेथील निर्मात्यांना दाखवले. या चित्रपटांतील दादासाहेबांच्या तांत्रिक अंगांचे परदेशातही खूप कौतुक झाले. इंग्लंडहून परतल्यावर पुढील दोन वर्षांत दादासाहेबांनी आगकाड्यांची मौज, नाशिक-त्र्यंबक येथील देखावे, तळेगाव काचकारखाना, केल्फाच्या जादू, लक्ष्मीचा गालिचा, धूम्रपान लीला, सिंहस्थ पर्वणी, चित्रपट कसा तयार करतात, कार्तिक-पूर्णिमा उत्सव, धांदल भटजीचे गंगास्नान, संलग्न रस, स्वप्नविहार हे माहितीपर आणि शैक्षणिक लघुपट तयार केले. त्यामुळे अनुबोधपटांच्या जनकत्वाचा मानही त्यांच्याकडेच जातो. इ.स. १९१७ मध्ये त्यांनी लंकादहन हा चित्रपट प्रदर्शित केला. शेठ मोहनदास रामजी आणि शेठ रतन टाटा इत्यादींच्या आर्थिक साहाय्याने ५ लाख रुपये भांडवल उभे करून 'फाळकेज फिल्म लिमिटेड' ही संस्था उभारण्याची योजना निश्चित केली; परंतु ती कार्यान्वित झाली नाही. तथापि कोहीनूर मिल्सचे वामन आपटे, माया भट्ट, माधवजी जयसिंग व गोकुळदास दामोदरदास या भांडवलदारांच्या भागीदारीत १ जानेवारी १९१८ रोजी 'फाळकेज फिल्मस'चे रूपांतर त्यांनी 'हिंदुस्थान सिनेमा फिल्म कंपनी' मध्ये केले. त्याच वेळी त्यांच्या कल्पनेत १९१४ पासून असलेले कायमचे चित्रपटनिर्मितीगृहही नासिक येथे त्यांनी उभारले. या संस्थेद्वारे दादासाहेबांनी दिग्दर्शन




केलेले श्रीकृष्णजन्म (१९१८) व कालियामर्दन (१९१९) हे दोन्ही चित्रपट अत्यंत यशस्वी ठरले; परंतु या चित्रपटानंतर त्यांचे इतर भागीदारांशी मतभेद सुरू झाले. म्हणून मन:शांतीसाठी ते १९१९ अखेर सहकुटुंब काशीला निघून गेले. तेथील वास्तव्यात त्यांनी रंगभूमी हे नाटक लिहून त्याची निर्मिती केली; पण त्यास व्यावसायिक यश मिळाले नाही. इ.स. १९२२ मध्ये ते कंपनीत परतले. इ. स. १९३४ पर्यंत हिंदुस्थान सिनेमा फिल्म कंपनीने एकूण ९७ चित्रपट काढले. त्यात फाळके यांनी दिग्दर्शन केलेले ४० चित्रपट होते. त्यांनी या कंपनीकडून दिग्दर्शित केलेला 'सेतुबंधन' हा १९३२ चा शेवटचा चित्रपट होय. व्यवहार विन्मुखतेमुळे त्यांना निष्कांचन अवस्थेत दिवस कंठण्याची वेळ आली, तरीही त्याही अवस्थेत वयाच्या ६० व्या वर्षी त्यांनी कोल्हापूर सिनेटोनसाठी गंगावतरण (१९३७) हा त्यांचा पहिला आणि शेवटचा बोलपट निर्माण केला आणि निवृत्ती स्वीकारली. भारतीय चित्रपट व्यवसायास २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त १९३२ ला मुंबईतील महोत्सवात कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून फाळके यांना पाच हजार रुपयांची थैली अर्पण करण्यात आली.

## भारतीय चित्रपटसृष्टीचे पितामह

दादासाहेबांनी चित्रपट निर्मितीच्या तंत्राचा अथक परिश्रम करून अभ्यास केला. परिणामस्वरूप १९११-१२ च्या काळात दृष्टिदोष निर्माण झाला; पण चिकाटीने त्यांनी त्यावर मात केली. तत्कालीन भारतीय समाजव्यवस्थेत चित्रपट निर्मिती

करताना सामाजिक अडचणींबरोबरच आर्थिक अडचणींनाही त्यांना सामोरे जावे लागले. चित्रपटात काम करण्यासाठी स्त्री कलावंतासोबतच पुरुष कलावंतही तयार होत नसत. अशावेळी गरज पडल्यास ते स्वत: किंवा कुटुंबीयांपैकी कोणालातरी ते उभे करीत. सुरुवातीच्या त्यांच्या चित्रपटातील स्त्री पात्रांच्या भूमिकाही त्यांनी पुरुषांकडूनच करून घेतल्या. त्यांना अनेक कला अवगत असल्यामुळे, त्याचा उपयोग त्यांनी चित्रपटनिर्मिती करताना केला. त्यामुळे ते चित्रपट तांत्रिकदृष्ट्या उत्तम असत. त्याकाळी परदेशातही चित्रपट निर्मिती करण्याचा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवण्यात आला. पण त्या मोहाला बळी न पडता त्यांनी भारतातच चित्रपट निर्मिती केली. आपल्या दैदिप्यमान कारकीर्दीत त्यांनी एकूण ९५ चित्रपट आणि २६ लघुपटांची



निर्मिती केली. आर्थिक विवंचनेतच ६ फेब्रुवारी १९४४ ला वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांचे नासिक येथे निधन झाले.

दादासाहेबांच्या जन्मशताब्दीपासून १९६९ साली भारत सरकारने 'दादासाहेब फाळके पुरस्कार' देण्यास सुरुवात केली. हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार आहे. याचे स्वरूप दहा लाख रुपये आणि सुवर्णकमळ असे आहे. भारतीय चित्रपटसृष्टीत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कलावंत-तंत्रज्ञाला या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारतीय टपाल खात्यानेही दादासाहेबांच्या सन्मानार्थ १९७१ साली त्यांचे छायाचित्र असलेल्या टपाल तिकिटाचे अनावरण केले. मुंबई येथील चित्रनगरी (फिल्मसिटी) आता दादासाहेब फाळके चित्रनगरी या नावाने ओळखली जाते. दिग्दर्शक परेश मोकाशी यांनी २००९ साली "हरिश्चंद्राची फॅक्टरी" या चित्रपटातून दादासाहेबांचे कार्यकर्तृत्व प्रेक्षकांसमोर आणले.

महाराज सयाजीराव गायकवाडांच्या कल्पकतेमधून सुरू केलेल्या कलाभवनाने भारताला अनेक रत्ने दिली. या रत्नांनी त्यांच्या अद्वैत कार्याने भारतला प्रगत बनविण्यासाठी मोलाचे योगदान दिले. महाराजांनी आधुनिक भारताचे पाहिलेले स्वप्न कलाभवनात शिकलेल्या विद्यार्थांनी पूर्ण केले. कलाभनवाची स्थापना हा निर्णय किती काळाच्या पुढे होता, हे आज आपल्याला जाणवते. कलाभवनात तयार झालेले हे रत्न आज अजरामर

झाले आहेत. सयाजीरावांनी योगी अरविंद घोष, बाबासाहेब आंबेडकरांसारखी रत्ने पदरी बाळगली होती. दादासाहेब फाळके असेच बडोद्याच्या राजमुकुटातले एक चमकणारे रत्न होते. ज्याचा आज बडोदेकरांना अभिमान वाटतो.

*भारतीय चित्रपटाचे जनक दादासाहेब फाळके यांचा बडोद्याशी असलेला ऋणानुबंध त्यांच्याच शब्दात फार काही सांगून जातो. ते लिहितात,*

"जेव्हा प्राध्यापक गज्जर चाळीस वर्षांपूर्वी कलाभवनाचे प्राचार्य होते तेव्हा मी कलाभवनाचा विद्यार्थी होतो. माझी चित्रकला, छायाचित्रण, मातीची शिल्पकला वगैरेचे काम पाहून खूपच खुश झाले. तेव्हा त्यांनी मला शिष्यवृत्ती तर दिलीच; पण उदार मनाने कलाभवनाची प्रयोगशाळा व कलादालन यांचा मुक्त वापर करण्याची परवानगी दिली आणि मला वाटते या औदार्याचा चांगला उपयोग मी केला. फोटो अनग्रेव्हिंग व फोटो प्रिंटिंग वर्क हे त्या ज्ञानाचेच फळ आहे. गोऱ्या साहेबांनी त्या कामाचे खूप कौतुक केले आहे. त्या काळात श्री. डब्ल्यू रे ही एकच व्यक्ती होती, ज्यांच्याकडे हे कलादालन होते. नंतर एका श्रीमंत व्यक्तीच्या पैशाच्या गुंतवणुकीमुळे माझ्या स्टुडिओचे रुपांतर लक्ष्मी आर्टवर्कमध्ये झाले.

आता माझा व्यवसाय इनॅमलिंग, फोटो सिरॅमिक, मातीची शिल्पकला हा आहे. त्यास चांगले भवितव्य आहे असे मला

वाटते. माझ्या कलाभुवनाच्या अनुभवाने मी आणि माझ्या तरुण मित्रांनी ज्या प्राथमिक पण आवश्यक गोष्टी शिकण्यास उद्युक्त झालो, त्याबद्दल मला तुम्हाला सांगावेसे वाटते. या सर्व गोष्टी मला कलाभवनच्या वास्तव्यातच मिळालेली शिकवण आणि अनुभव याचेच फळ आहे. चित्रपट व्यवसायात शिरायचे मी जे धाडसी पाऊल उचलले, त्याने मला देशातच नव्हे तर सर्व आशियात कीर्ती मिळवून दिली. माझ्या चित्रपटाचे चित्रीकरण इंग्लंडमध्ये झाले. त्याबद्दल जगप्रसिध्द समीक्षक चू यांची प्रशंसा त्यांच्याच शब्दात सांगायची झाली तर ते म्हणतात, "तांत्रिक दृष्टीने पाहता फाळकेंचे काम आश्चर्यकारकरीत्या उत्कृष्ट झाले आहे. आम्हाला तर वाटते की, श्री. फाळके इंग्लंडमध्ये कुठेतरी जन्माला यायला पाहिजे होते,"

महाराजा सयाजीरावांचे बडोदा हे असे शहर होते की, जेथे मला चित्रपटनिर्मितीसाठी लागणारी मूलभूत साधने मिळाली. माझ्या तेथील वास्तव्यात श्री. सयाजीराव वाचनालयाचा जेवढा चांगला उपयोग मी केला तेवढा फार कमी लोकांनी केला असेल. श्रेष्ठ मराठी नाटककार शंकर मोरो रानडे माझे नाट्यकलेचे गुरू होते. बाबासाहेब रानड्यांसारख्या चौकस व दूरदृष्टी असलेल्या माणसाने माझ्यातला कवी व नट बरोबर हेरला. त्यांनी माझ्या गुणाचा मन लावून विकास केला. वेणीसंहार नाटक महाविद्यालयाने सादर केले. त्या वेणीसंहार नाटकाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी साहजिकच माझ्यावर येऊन पडली.

तेव्हापासून मी लहान लहान कविता खूप लिहिल्या व चारशे - पाचशे लोकांपुढे कीर्तन केलीत. मौलाबक्ष यांच्या गायन शाळेत माझ्या गोड आवाजावर शास्त्रोक्त संगीताचे संस्कार झाले. मला जादूची आवड होती. भाऊसाहेब मुजुमदारांना जादूचे प्रयोग खूप आवडायचे. या इतर कलांच्या मागे लागल्यामुळे माझ्या फोटोग्राफीच्या अभ्यासात खंड पडला. कसेही असले तरी माझ्या जादूच्या प्रयोगांना चांगली दाद मिळाली. हजारो लोकांपुढे मी प्रयोग केले. गज्जर मास्तर इतके खुश झाले की, त्यांनी माझा प्रयोग काही जर्मन प्राध्यापकांसमोर ठेवला. तेसुध्दा प्रयोग पाहून आश्चर्यचकित झाले; पण मला कधीच प्रो. जादूगार फाळके व्हायचे नव्हते. तेव्हा लवकरच मी माझ्या मूळ कामाकडे वळलो.

थोडक्यात मला सयाजीराव महाराजांची राजधानी बडोद्याने यशस्वी चित्रपट निर्मात्याचा विकास होण्यासाठी ज्या ज्या अंगभूत गुणांची जरूर असते ते मिळवण्यास खूप मदत केली. आज जे माझे वैभव आहे त्याचे श्रेय माझ्या बडोद्याच्या वास्तव्याला आणि तिथल्या कलाभवनच्या तंत्रज्ञानाला आहे. श्री. कॉसीन नावाचे भारत सरकारच्या पुरातन वस्तू शास्त्राच्या खात्याचे मुख्य अधिकारी होते. त्यांनी माझ्या कामात खूप रस घेतला. त्यांनी मला त्यांच्या खात्यात घेण्याचा खूप प्रयत्न केला. यावरून मला पुरातन वस्तूशास्त्र वास्तुविद्या यात किती गोडी होती हे तुम्हाला कळेल.

आता मी वृध्द झालो आहे. ६६ वे वर्ष ओलांडत आहे. तरीसुध्दा माझी प्रकृती ठणठणीत आहे. दिवसाकाठी पाच-सहा मैल सहज चालू शकतो. तीन वेळा युरोपला जाऊन आलो आहे. आजही अभिमानाने सांगू शकतो की, मी चहा किंवा सिगारेटला स्पर्शपण केला नाही. येथे सांगायला हरकत नाही की, हे दीर्घ व निरोगी आयुष्य मी जगतो आहे ते मी चांगल्या सवयी जपल्या आहेत म्हणून मी कलाभवनाच्या संवगड्यांना व्यसनापासून दूर राहण्याची विनंती करतो.

मी सयाजीराव महाराजांना व कलाभवनाला दीर्घ आयुष्य चिंतितो."

- दादासाहेब फाळके


## भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक महाराजा सयाजीराव आणि दादासाहेब

भारतीय चित्रपटसृष्टीचे पितामह दादासाहेब फाळके हे जणू महाराजा सयाजीराव गायकवाड यांची प्रतिकृतीच होते. आज या दोन्ही नाशिकच्या सुपुत्रांनी इतिहासात आपले नाव अजरामर केले आहे. दादासाहेबांनी अनेक कला शिकण्याचा ध्यास घेतला. त्या शिकताना झोकून देऊन त्यांनी काम केलं. महाराजा सयाजीरावांनीही आयुष्यभर जनकल्याणाचा ध्यास घेत बडोद्यात साहित्य, कला, संस्कृती, सुप्रशासन, शेती-उद्योग

त्या सोबतच स्वातंत्र्ययोद्ध्याचे खंबीर पाठीरीखे, या ही गोष्टींचा ध्यास घेतला होता. या कामात दादासाहेब आणि महाराजांचे एक महत्त्वाचे साम्य दिसून येते. दोघेही आयुष्यभर निर्व्यसनी होते. प्रकृती स्वास्थ्यासाठी त्यांनी दररोज नियमित चालण्याचा व्यायाम केला. आजूबाजूच्या मंडळींना व्यसनापासून दूर राखण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १९१० मध्ये त्यांनी नगर विकास सुधारणा विश्वस्त मंडळाची स्थापना केली होती. महाराजा सयाजीराव गायकवाडांनी बडोद्याला प्रथम चित्रपट गृह इ. स. १९२९ मध्ये निर्माण केले. तेच पुढे शिवाजी - चित्रभवन व नंतर Prince टॉकीज या नावाने प्रसिध्द झाले. इ. स. १९३४ मध्ये बडोदे आकाशवाणीच्या स्थापनेची घोषणा झाली. (City Improvement Trust) सहकारी मंडळी, Bank of Baroda, वृक्षारोपण अशाप्रकारे अनेक उत्तम कामे करून सयाजीरावांनी हे सिध्द केले की ते केवळ एक राजा नसून प्रजापती, प्रजापालक पिता व नेता तसेच स्वत: बडोदा नगरीचे विश्वस्त आहेत. महाराजांनी बडोदे राज्याला "संस्कार नगरी" चा मान मिळवून देण्यासाठी तन, मन आणि धन ओतून कार्य केले, हे सहज लक्षात येते. म्हणूनच आज आपण कितीही प्रगत असलो तरी १४० वर्षांपूर्वी महाराजांनी प्रगत राष्ट्रासाठी जे धोरण अवलंबविले, ते आजही लागू पडत आहे,

हे अद्भूत आहे. खरोखर महाराजांनी त्यासाठी आपले आत्मबळ, पुरुषार्थ, धैर्य, सबुरी, अथक मेहनत व दूरदृष्टी यांच्या मदतीने आपली सर्व स्वप्ने पूर्ण केलेली दिसतात. गौरवशाली इतिहास घडविणाऱ्या राष्ट्रप्रेमी सयाजीरावांचे हे ऋणच आहे.




●●●

# संदर्भ

१. वाटवे बापू , १९१७, दादासाहेब फाळके, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली.

२. भांड बाबा, २०१७, गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

३.मालुंजकर भांड धारा, २०२०, ललितकला, खंड २५, भाग ५, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

● महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.

● सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि.,११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com